# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

Original Article

# संत एकनाथांच्या भारूडातील समाजदर्शन

**डॉ.नानासाहेब शामराव यादव**
प्राचार्य, द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा
**Email:** dr.nanasahebyadav@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180226
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2(A)
Pp. 132-138
February - 2026
**Submitted:** 17 Jan. 2026
**Revised:** 27 Jan. 2026
**Accepted:** 12 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***सारांश***

*संत एकनाथ हे वारकरी परंपरेतील एक महत्त्वाचे संत, कवी आणि समाजप्रबोधक होते. त्यांच्या भारूड या लोकाभिमुख काव्यप्रकारातून त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, दांभिकता, जातिभेद, अहंकार, विषयासक्ती यांवर प्रभावी टीका केली. भारूड हा केवळ मनोरंजनाचा प्रकार नसून तो लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे, हे एकनाथांनी सिद्ध केले. वारकरी संप्रदाय परंपरेत विठ्ठलभक्ती, समता आणि मानवतेचा संदेश दिला जातो. या परंपरेला बळकट करणारे स्तंभ म्हणून एकनाथांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी 'हिंदू-तुर्क संवाद', 'जोहार', 'वासुदेव', 'विंचू', 'भटीण', 'दादला' इत्यादी भारूडांमधून सामाजिक समन्वय, धार्मिक सहिष्णुता आणि नैतिक मूल्यांचा पुरस्कार केला.*

***मुख्य शब्द:*** *संत एकनाथ, वारकरी संप्रदाय, भारूड, समाजदर्शन, समता, विठ्ठलभक्ती, लोकशिक्षण, प्रबोधन, अध्यात्म, जातिभेद, धार्मिक समन्वय, नैतिक मूल्ये.*

## प्रस्तावना

संत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ असून, त्यामध्ये अद्वैतवाद, मानवता आणि समतेचा गाभा आहे. संतांनी आपल्या वाणी आणि लेखनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या कृती आणि विचारात सुसंवाद असल्यामुळे त्यांचे साहित्य आजही कालातीत वाटते. 'जे जे भेटे भूत, ते ते मानिजे भगवंत' या उक्तीप्रमाणे प्रत्येक सजीवामध्ये ईश्वराचे दर्शन करणाऱ्या संतांची भूमिका समाजसुधारणेत प्रभावी ठरली.

संत साहित्य धार्मिक वाङ्मयाचा भाग असला, तरी त्याचा उद्देश केवळ कर्मकांडात अडकलेला नसून, जीवनमूल्ये रूजविणे हा आहे. धर्माच्या केवळ बाह्य आडंबरांपेक्षा संतांना त्याचे आत्मिक स्वरूप महत्त्वाचे वाटते. त्यामुळे संत हे धर्म आणि सामान्य माणूस यांच्यातील दुवा ठरतात. बाराव्या शतकातील ज्ञानेश्वरांनी या परंपरेची मुहूर्तमेढ रोवली आणि तुकयांच्या काळात तिचा कळस चढला. संत बहिणाबाईंनी या परंपरेचा क्रम खालील अभंगातून मांडला.

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।
नामा तयाचा किंकर। तेणे केलासे विस्तार।।
एकनाथ जनार्दन। स्तंभ दिला भागवत।।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।

या अभंगानुसार भागवत धर्माच्या मंदिराला स्थैर्य देणारा स्तंभ म्हणजेच संत एकनाथ. त्यांच्या जीवनकहाणीवर दृष्टिक्षेप टाकला असता, एक भक्तिप्रवण, ज्ञानसंपन्न आणि सामाजिक समत्वाचा प्रचारक असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.नानासाहेब शामराव यादव, प्राचार्य, द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा*

**How to cite this article:**
*यादव, . नानासाहेब . शामराव . (2026). संत एकनाथांच्या भारूडातील समाजदर्शन. Journal of Research & Development, 18(2(A)), 132–138. https://doi.org/10.5281/zenodo.18934103*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18934103

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया ।।
नामा तयाचा किंकर। तेणे केलासे विस्तार ।।
एकनाथ जनार्दन। स्तंभ दिला भागवत ।।
तुकाझालासे कळस । भजन करा सावकाश ।।

संत बहिणाबाई

महाराष्ट्राच्या संस्कृती संवर्धनामध्ये वारकरी संप्रदायाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. विठ्ठलभक्तीच्या माध्यमांतून भक्तीची सोपी वाट सामान्यजनांच्या, उपेक्षितांच्या, स्त्रियांच्या अंतःकरणात निर्माण करण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले आहे. संत ज्ञानदेवांनी भावार्थदीपिकेतून सर्वांना ज्ञानाची दारे खुली केली. संत ज्ञानेश्वरांपूर्वी वारकरी संप्रदाय अस्तित्वात असला तरी त्यांनी आपल्या ग्रंथामधून व कार्यातून संप्रदायास मूर्त रूप दिले आहे. समाजाने वाळीत टाकले असतानाही संत ज्ञानेश्वरांनी हे विश्वचि माझे घर' अशी विश्वात्मक शिकवण दिली आहे. 'आम्हा सापडले वर्ग करू भागवत धर्म 'असे म्हणणा-या संत नामदेवांनी पंढरपूरच्या वाळवंटात सर्व जातीधर्माच्या भक्तांना कीर्तनाच्या माध्यमांतून एकत्र आणले. समाजात लोकशिक्षकाची भूमिका पार पाडत असतांना संत एकनाथांनी भारूड व गवळणीच्या माध्यमातून अशिक्षित समाजात जागृती घडवून आणली वारकरी संप्रदायाचे कळस असणा-या संतश्रेष्ठ जगद्गुरू संत तुकारामांची अभंगवाणी आजही आपल्या मनाला साद घालत आहे. संत मुक्ताई संत जनाबाई, संत चोखोबा, संत्त गोरोबा या संतमेळयाचे कार्य अनमोल आहे. आजच्या काळातही वारकरी संतांची नीतिमूल्यांची शिकवण समाजाचे प्रबोधन करत आहे.भारतीय भक्तिसंप्रदायात 'वारकरी संप्रदाय' हा प्रमुख संप्रदाय आहे. वारकरी संप्रादायास 'वैष्णव संप्रदाय, 'भागवत धर्म' असेही म्हणतात. वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत आहे.विठ्ठलाची उपासना करणारा तो 'भागवत संप्रदाय' होय. विठ्ठल म्हणजेच परमेश्वराचे मूळ शुध्द प्रेमस्वरूपच होय. जाखाई, जोखाई, म्हसोबा, मरीआई, बहिरोबा या देवतांची पूजा न करता विठ्ठलाची पूजा करावी असे वारकरी संतांनी सांगितले आहे.

अंधश्रद्धा,व्रतवैकल्य यामध्ये अडकलेल्या समाजाला 'विठ्ठल' भक्तीच्या माध्यमांतून वारकरी संतांनी एकत्र आणले आहे. महाराष्ट्राच्या संस्कृती संवर्धनामध्ये 'वारकरी संप्रदायाचे' अनन्यसाधारण महत्त्व आहे. विठ्ठलभक्तीच्या माध्यमांतून भक्तीची सोपी वाट सामान्यजनांच्या, उपेक्षितांच्या, स्त्रियांच्या अंतःकरणात निर्माण करण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले.संत ज्ञानदेवांनी भावार्थदीपिकेतून सर्वांना ज्ञानाची दारे खुली केली.आपण सर्व समान आहोत असा आत्मविश्वास ज्ञानदेवांनी दिला. वारकरी संतांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केलेला आहे. हिंदू मुस्लिम असा भेद विठ्ठलाच्या दारी नाही हे त्यांनी पटवून दिले आहे. शेख महंमद, बहिरा पिसा, शेख सुलतान हे विठ्ठलभक्त होते. विविध जातीतील संतांनी अभंगरचना केली आहे. विठ्ठलाची भक्ती करतांना कोणीही उच्च-नीच हा भेद मानला नाही. लहान-मोठे सर्वच संत एकमेकांच्या पाया पडत. आध्यात्मिक समता निर्माण करण्याचे मोठे कार्य वारकरी संतांनी केले आहे. वारकरी संतांनी चातुर्वर्ण्यच्या आणि जातिव्यवस्थेच्या चौकटीविरूद्ध बंड उभारले नाही. तथापि आध्यात्मिक लोकशाही प्रस्तापित करण्याचे कार्य वारकरी संतांनी केले.

संत एकनाथांचा जन्म मराठवाड्यातील पैठण येथे इ. स. १५३३ (शके १४५५) मध्ये झाला. संत भानुदासांच्या कुळामध्ये देशस्थ ऋग्वेदी आश्वलायन ब्राह्मण कुटुंबामध्ये रूक्मिणीबाई आणि सूर्यनारायणयांच्या पोटी झाला.ज्यांनी विजयनगरहून श्री विठ्ठलाची मूर्ती पंढरपुरात परत आणली त्या संत भानुदासांचे नाथ हे पणतू होत. भगवदभक्ती त्यांच्या घराण्यात पूर्वीपासून चालत आलेली. कला-कवी भुवनेश्वर हे नाथांचे नातू होय. एकनाथांच्या जन्मानंतर लगेच आई-वडीलांचा मृत्यू झाला. त्यामुळे आजोबा व आजी यांनी त्यांचे पालनपोषण केले. घरातील वातावरण सात्विक व श्रद्धाशील असल्यामुळे नाथांच्या मनावर ईश्वरभक्तीचे संस्कार झाले. एकनाथ मुळातच अंतर्मुख असल्याने गावातील शिव मंदिरात नामस्मरण करण्यात बराच वेळ घालवत असत. परमार्थातील गुरूचे महत्त्व त्यांना मान्य होते. त्यामुळे एक दिवस अचानक ते घराबाहेर पडले आणि गुरूच्या शोधार्थ फिरत ते दौलताबादला पोहोचले. तेथे जनार्दनपंत आणि हे यवन पातशाहीतील मुख्य अधिकारी म्हणून काम पाहत होते. नाथांना त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराची प्रचिती आली ते त्यांची मनस्वी सेवा करू लागले त्यातून त्यांनी एकनाथांना गुरूपदेश दिला तेथे राहून त्यांनी ग्रंथांचे वाचन, कृष्णोपासना, आत्मचिंतन केले. स्वामींनी त्यांना तीर्थयात्रेस पाठविले. ते स्वतः नाशिक, त्र्यंबकेश्वरापर्यंत नाथांसोबत गेले. या तीर्थयात्रेतच नाथांनी चतुःश्लोकी भागवत लिहिले. हा त्यांचा पहिला ग्रंथ होय. तीर्थयात्रा पूर्ण करून १४७८ च्या सुमारास ते पैठण येथे परतले. आणि त्यांचा विवाह झाला. गिरिजा हे त्यांच्या पत्नीचे नाव ते शके १४७८ ते १४९१ या काळात पैठणमध्ये राहिले. या काळात हरिपंडित हा मुलगा आणि गोदा व गंगाया मुली झाल्या. त्यांचे भजन, कीर्तन, प्रवचन इ. उपक्रम आणि लहान-मोठ्या ग्रंथांचे, अभंगादि स्फूटकाव्य प्रकाराचे लेखन सुरू होते. ज्ञानेश्वरांविषयी त्यांच्या मनात नितांत आदर होता. आळंदीतील त्यांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला. जनसामान्यांना डोळस बनविण्याची, लौकिकाच्या माध्यमातून अलौकिकत्वाचा परिचय करून देण्याची आणि परमेश्वरभक्तीची गोडी लावण्याची नाथांची वृत्ती त्यांच्या समग्र साहित्यातून प्रत्ययास येते. अशा या महाराष्ट्राचा नाथ समन्वयकार एकनाथ यांनी महाराष्ट्र भागवत धर्माची समर्थ अशी उभारणी महाराष्ट्रात केली. इ.स. १५९९ मध्ये नाथांनी इहलोकीचा निरोप घेतला.

**भारूड: एक साहित्यप्रकार**

1. **भारुडाची संकल्पना**
2. भारूड हा लोकभाषेतील आणि लोकशैलीतील एक काव्यप्रकार आहे. यामध्ये मनोरंजन आणि उपदेश यांचा संगम असतो. संत एकनाथांनी भारूडाला समाजजागृतीचे माध्यम बनवले. त्यांनी भारुडांतून लोकांना धर्म, नीतिमत्ता, समता आणि सेवा यांचे संदेश दिले.
3. 'भारूड' हे खरे तर लोकसंगीताशी संबंधित आहे, त्यामुळे लोकसंस्कृतीच्या अनुयायांशी त्यांचा संबंध कायम ठेवला आहे. वासुदेव, जोशी, पिंगळा, डमरूवाला, डोंबारी यांच्यासोबतच आंधळा, पांगळा, बहिरा, मुका, शकुन आणि कोल्हाटी तसेच चोपदार हे सर्वांनी जनसमुदायाचे दर्शन घडवले आहे. फक्त इतकंच नाही तर कुत्रे, पोपट, एडका सारखे प्राणी देखील विचारात घेतले गेले आहेत. यावरून नाथांच्या भारूडांचा एक मुख्य विशेषता म्हणजे ते लोकजीवनाशी जवळीक साधतात, हे स्पष्ट होते. सण, समारंभ आणि विविध विधी, लपंडाव, टिपरी, फुगडी, हुतूतू यांसारखे खेळ किंवा भुत्या, वाघ्या, संन्यासी, भटीण, कुंटीण, नकटी, सौरी, माळी, जंगम, बायला आणि दादला सारख्या समाजातील विविध प्रवृत्तीयुक्त व्यक्तींवर आधारित नाथांनी रचलेल्या आध्यात्मिक प्रतीकांमध्ये प्रबोधनाच्या पाऊलखुणांचा समावेश आहे. या प्रत्येक विषयाचे लौकिक स्वरूप एकनाथ यांनी वर्णन केले आहे.
4. एकनाथांनी अर्जदास्त, ताकीदपत्र यासारख्या भारूडातून तत्कालीन राजकीय, शासकीय व्यवहाराचेही दर्शन खुमासदारपणे घडविले आहे. तर त्यांच्या हिंदू-तुर्क संवादासारख्या भारूडातून त्याकाळी इस्लाम धर्माशी घडणारा संघर्ष प्रतीत होतो. 'हिंदुकु तुरक कहे काफर। तो म्हणे विटाळ होईल परता सर। दोन्हींशी लागली करकर। विवाद थोर मांडला ॥' (हिंदु-तुर्क संवाद) परंतु येथे नाथांची भूमिका समन्वयाची असून दोन्ही धर्म परमार्थाकडेच नेणारे असल्यामुळे धर्माच्या नावावरून विवाद करणे व्यर्थ असल्याचे नाथांनी पटवून दिले आहे. परमार्थाच्या मार्गात जातीपातीचे, श्रेष्ठ-कनिष्ठतेचे सगळे भेद निरर्थक, अज्ञानमूलक असल्याची नाथांची भूमिका यातून अत्यंत परखडपणे व्यक्त झालेली आहे.

**भारुडाविषयी अभ्यासकांची मते :**

प्रा. म.ना. पुरंदरे म्हणतात –

"*भारुड हा संतांनी लोकशिक्षणासाठी वापरलेला लोककलेचा काव्यप्रकार आहे. यात गमती-जमतीतून समाजाला उपदेश केला जातो.*" [१]

डॉ. ग.ह. भट यांच्या मते –

"*भारुड हा संतकाव्यातील लोकाभिमुख प्रकार आहे. एकनाथांनी भारुडाला भक्तिसाहित्यात स्थान दिले आणि त्याला समाजशिक्षणाचे साधन केले.*" [२]

डॉ. वि.स. भालेराव लिहितात –

"*भारुड हे फक्त मनोरंजनाचे साधन नाही; ते लोकांना नैतिकतेचे धडे देणारे काव्य आहे. विनोद व व्यंग यांच्या आडून गंभीर जीवनतत्त्वज्ञान व्यक्त होते.*"[३]

प्रा. वि.कृ. राजवाडे यांच्या मतानुसार –

"*भारुडाच्या रंगभूमीवर समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती उतरतात. दारुड्या, भिकारी, व्यापारी, स्त्री-पुरुष, शेतकरी, मुसलमान – सर्वांचे जीवनदर्शन भारुडातून घडते.*"[४]

डॉ. शंकर महाजन म्हणतात –

"*भारुड ही तत्त्वज्ञान शिकविण्याची लोकभाषेतील शाळा आहे. यातून भक्तिमार्ग, सदाचार, संयम या मूल्यांचा प्रसार होतो.*"[५]

१. **संत एकनाथांची भारुडे**

प्रत्यक्ष उपदेश न करता अप्रत्यक्ष मार्गाचा वापर करून नाथांनी लोकजागरणाचे यशस्वी कार्य केले. ते म्हणतात.मी संतमहात्म्य ऐकले नाही, साधूसंतांची सेवा केली पितृवचन ऐकले नाही..... पाळले नाही. तीर्थव्रतांचे पालन न करता त्यांचा त्यागच केला. गुरूशब्द कधी मानला नाही, आईचे कधी ऐकले नाही, म्हणून मी या नरदेही बहिरा झालो.. पण आता मात्र मी जनार्दन स्वामींचे स्मरण करेन, गुरूंची सेवा करेन....... अशा पद्धतीने नाथांनी हा एक आगळा मार्ग उद्बोधनासाठी निवडला आहे. 'भारूड' हा मुळात लोकगीतांचा प्रकार असल्यामुळे लोकसंस्कृतीच्या उपासकांशीही त्यांनी आपला संबंध अबाधित राखला. नाथांनी भारूडामध्ये पहाटे गीत म्हणणारा लोकसंस्कृतीचा उपासक वासुदेव, भविष्यकथन करणारा जोशी, पिंगळा, डमरूवाला, डोंबारी याशिवाय आंधळा, पांगळा, बहिरा, मुका, शकुन, कोल्हाटी, चोपदार इ. जनसमुदायाचे दर्शन घडविले आहे. इतकेच नाही तर कुत्रे, पोपट, एडका यासारखे प्राणीही विचारात घेतले आहे. यावरून लोकजीवनाशी जवळीक साधणे हा नाथांच्या भारूडाचा महत्त्वाचा विशेष आहे हे लक्षात येते. विविध सण, समारंभ आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

त्यातील विधी, लपंडाव, टिपरी, फुगडी, हुतूतू यासारखे खेळ अथवा भुत्या, वाघ्या, संन्यासी, भटीण, कुंटीण, नकटी, सौरी, माळी, जंगम, बायला, दादला अशासारख्या समाजातील विविध वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्ती अथवा होळी, शिमगा सारख्या सणाच्या प्रथेवर नाथांनी रचलेली आध्यात्मिक रूपके लोकजीवनाला दिशा देणारी त्यांच्यात प्रबोधनाच्या पाऊलखुणा रुजविणारी आहे, या प्रत्येक विषयाचे लौकिक स्वरूप एकनाथ वर्णन करतात त्यावरून त्यांच्या चौफेर निरीक्षणाची जशी कल्पना येते तशीच त्यातून त्यांची आध्यात्मिक प्रगल्भताही सिद्ध होते.

२. **घटना-प्रसंग-अनुभवदर्शक भारूडे**

नाथांची काव्यदृष्टी चौफेर होती. व्यक्ती, समाज, संसार यातील नित्याच्या घटना-प्रसंग आणि जीवन जगताना येणारे अनुभव यांची कलात्मक निवड करून नाथांनी काही भारूडे रचिली. सासुरवास, लग्न, अष्टपदी, थट्टा, बाजार, स्वप्न, नवल, कोडे, संसार ही भारूडे या संदर्भातील आहेत. संसार व्यर्थ आहे. खोटा आहे, मायावी आहे, त्यात गुंतून न राहता परमेश्वराचे नामस्मरण, भक्ती करावी असा उपदेश तर केलाच पण त्यातून मौलिक असे आध्यात्म सांगितले. सासर, माहेर या स्त्री-जीवनातील महत्त्वाच्या ठिकाणांचा, घटनांचा नाथ आपल्या भारूडात वापर करून जे रूप देतात ते लक्षणीय आहे. विषय म्हणजे सासर, अविवेक म्हणजे पती, अहंकार सासरा, कल्पना सासू, काम-क्रोध हे दीर कल्पून हे मला फार छळतात आणि मला माहेर म्हणजेच परमात्म्याची आठवण येते. या सर्वातून सद्‌गुरूची कृपा सुटका करू शकते सुटका झाल्यावर अज्ञानाचा पडदा दूर होईल असा विचार ते व्यक्त करतात.

प्रपंचाचे ताक तुम्ही साचविले घरी
संचिताचे दुग्ध लोणी गमाविले चोरी ।।

अशा सहज सुंदर दृष्टांतांचा वापर करून जीवनाचे तत्वज्ञान बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य एकनाथांनी केले. लोकांच्या नित्य परिचयाच्या घटना असल्याने त्यांना सहजपणे आकलन होईल अशा सहज सोप्या शब्दात मांडून रसिकांना आकर्षित करून घेत हलकेच त्यांच्या अंतःकरणात शिरून त्यांना अध्यात्माची ओळख करून देतात. त्यांच्या या भारूडातून त्यांच्या सूक्ष्म समाज निरीक्षणाची साक्ष पटते तशीच त्यांच्या कवित्वाचीही साक्ष पटते.

३. **पशु-पक्षी-प्राणीविषयक भारूडे**

चराचर सृष्टीतील अनेक घटकांना नाथांनी भारूडात स्थान दिले आहे. सृष्टीतील प्राण्यांनाही त्यांनी काव्य विषय म्हणून स्वीकारले व त्यांना देववाणीने लोकांशी संवाद करावयास लावले त्यांच्या सर्प, विंचू यासारखे विषारी प्राणी तसेच बैल, गाय, कुत्रा हे पाळीव प्राणी आणि टिटवी, पिंगळा, पोपट असे पक्षी ही आहेत. नाथांच्या भारूडातील प्राणी जनसामान्यांना त्यांच्याशी सुसंवाद साधून अध्यात्मबोध करताना दिसतात. त्यांचे 'विंचू' हे भारूड सर्वश्रुत आहे. 'काम-क्रोध' यांची तुलना ते विंचवाच्या डंखाशी करतात नाथांचा 'एडका' हा काम-क्रोधाच्या दुष्परिणामाविषयी बोलतो. तर गाय संतसहवास, सद्‌गुरूकृपा यांचे महत्त्व सांगते जीव नाथांनी 'सर्प' या भारूडात केले आहे. लोभरूपी डे कसा भ्रम पडतो याचे सुरेख वर्णन मुळे आणि स्वार्थामुळे पाय जड झाला. विषाच्या लहरीने शरीर तप्त झाले, देहाची लाही लाह।.... आहे तेव्हा सद्‌गुरूच्या कृपेच्या वाऱ्याची झुळूक मिळाली तर जीव शांत होईल अशी अपेक्षा या भारूडात नाथ व्यक्त करतात.

४. **खेळ–विषयक भारूड :**

समाज जीवनातील मनोरंजन प्रकारांचा स्वीकार करून नारायणांनी खेळांवर आधारित भारुड रचले आहेत. या भारुडांचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे गाडगे, डोंबारी, कोल्हाटी इत्यादी भटक्या लोकांच्या खेळांवर आधारित. हे लोक गावोगाव भटकून खेळ सादर करत लोकांना आनंद देतात, आणि नारायणांनी या खेळांवर आधारित भारुड लिहिले आहेत.

दुसरा प्रकार म्हणजे सामान्य लोकजीवनातील मनोरंजनासाठी खेळले जाणारे खेळ जसे की भांडू, फिगा, लंघडी, विटीदांडू, खंडेरी, दिव्या इत्यादी. या खेळांवरही नारायणांनी अप्रतिम भारुड तयार केले आहेत. नारायणांचा दृष्टिकोन असा आहे की समाजात नीती आणि सदाचार असला पाहिजे, तरच लोक खऱ्या अर्थाने आनंद घेऊ शकतात. त्यांच्या भारुडांमध्ये अध्यात्मनिष्ठा, नीती आणि सदाचार यांचा संदेश अत्यंत सुंदर आणि गुणगुणीत भाषेत दिला गेला आहे.

उदाहरणार्थ, 'फुगडी' हे भारुड नारायणांचे अप्रतिम उदाहरण आहे. या भारुडात फुगडी खेळातील विविध शारीरिक क्रिया वापरून परस्परसंवाद, अहंकारविरोधी विचार आणि भावनिक संवेदनांची महत्त्वता स्पष्ट केली आहे:

तुम्ही आम्ही दोघिन्ही मिगुनिजी सखये
मनबुध्दि चित्तयाक मिगुनिजी सखये।
जिवशिव भेदमग मिगुनिजी सखये।
फुगडी छू मगो होऊ छू छू छू छू फुगडी।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

फुगडीसारखेच विटीदांडू, खंडेरी आणि इतर खेळांवरही नारायणांनी अप्रतिम भारुड रचले आहेत. त्यांनी समाजातील प्रचलित खेळांचा कौशल्याने उपयोग करून आपल्या अध्यात्मविचारांना प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवले आहे.

**५. वास्तविक भाष्य :**

नाथांनी सजीवप्राणींचे निर्जीव वस्तूंप्रमाणे बोलवयाला सुरुवात करून सजीवांना लाजिरवाणे असे त्याचे बोल वापरले आहेत. संसारातील अनेक वस्तूंचा उपयोग नाथांनी भाष्यासाठी केला आहे. त्यातून त्यांची कथानक प्रत्येकास येते. रहाट, बाहुले, पण, चौपाळा, पाळणा, मोती हे वस्तूंचा वापर केला आहे. जिवाला विकृती प्राप्त झाल्यावर जुने असतानाही जीर्ण वस्त्रे फेकून देऊन नव-नवे शरीर करण्याची तयारी साठी लागणाऱ्या वस्तू रहाट, तात, बाह्या, पेंढू इ. रुपये करून बुद्धीचा वापर करणारे जीवांना आतापर्यंत पाहिलेल्या असतानाचे वस्त्रांचे वर्ण 'रहाट' या भाष्यात ते करतात. आत्मज्ञानामुळे अज्ञान दूर झाले व जीवांना परमात्म्याची ओळख कशी लागली यावर लक्षणे चिंतन ते करतात. त्यांच्या या स्वच्छतेचा भाष्यातून प्रचार, द्वेष, जीवाचे स्वतः करणारे विकार, इंद्रियांच्या स्वेच्छा, हेतबुद्धी आणि परमात्म्याशी गोडी हे प्रत्येकाची वर्णन केलेले आहे.

**पत्रात्मक भाष्य**

नाथांच्या शोधक आणि कल्पक दृष्टीतून तत्कालीन सरकार दरबाराचा प्रश्न ह्याबाबतही सुटलेला नाही. रचनेच्या सारख्या दृष्टीने नाथांची ही भाष्ये आली-वेगळी आहेत. आशीर्वाद पत्र, विनंती पत्र, अभयपत्र, अर्जदार, आज्ञा जाब, ताकीदपत्र, जाबाळीबद्दलची कल्पक भाष्य. भाष्यखंडा या वर्गात समावेश होतो. त्यांच्या पत्रात्मक भाष्याचा विशेष म्हणजे तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे दर्शन आपणास प्रत्यक्ष शिवाय त्यांच्या शैलीतून अध्यात्म विचारांपर्यंत प्रवाही येते. पारमार्थिक उपदेशासाठी नाथांनी तत्कालीन पत्रव्यवहाराच्या कौशल्यपूर्ण उपयोग केला आहे. नाथांनी या पत्रात्मक भाष्यातून रुपयांच्या भाषणांत पोट, कुलकर्ण, पटवारी, देशोई आणि इतर सरकारी अधिकाऱ्यांच्या दुराणी वर्तनाचे दर्शन घडविले. समाजाला हे अधिकारी सत्ताधारी लोक आपल्या दुराचारी वर्तनाने जे श्रम देतात तसेच विचार देहाला आणि देहाचा कारभार पाहणाऱ्या जीवांना ग्रस्त करतात म्हणून ते म्हणतात 'काम क्रोध हे राव यांचे नव्हे' तर 'नारदे जसे बाहेरून' आज्ञा झाडा करून स्वानंदनाचा जमावळे करावा. 'आज्ञा' या भाष्यातून उपदेशाच्या माध्यमातून त्यांनी जनतेत प्रबोधन केले आहे. काम, क्रोध, मोह, मत्सर यावर माणसांचे मन आणि इच्छा हाती होते ते दर्शविले आहे.

**संकीर्ण भाष्य**

नाथांनी विविध विषयांवर असेल भाष्यरचना त्यांची व्याख्या करून खूपच अवघड जाते म्हणूनच अन्य विषय विचारतील भाष्य 'संकीर्ण भाष्य' म्हणून कथा येईल. त्यात अक्कल, हिंदू-तुर्क संवाद, विशीजाद, हुशारी, मुंगी, डोहाळे, होळी, गोपाळ भाष्ये समाविष्ट करतात. रचनेच्या दृष्टीने नाथांच्या भाषणांचे छोटेखानी भाष्य, प्रदीर्घ भाष्य, पत्रात्मक भाष्ये आहेत हे काही संवादामय भाष्यांसाठी लिहिलेली आहेत. त्यात महा-ब्राह्मण, कुंडा-माणूस, ब्राह्मण-बैल भाष्ये लक्षणे आहेत. याशिवाय काही फुटकळ भाष्ये नाथांनी लिहिली आहेत. नाथांचे प्रत्येक भाष्य म्हणजे जीवनाच्या व्यक्त आणि सार्थकाची अनुभवाचा...

एकनाथांनी अर्जदास्त, ताकीदपत्र यासारख्या भारूडातून तत्कालीन राजकीय, शासकीय व्यवहाराचेही दर्शन खुमासदारपणे घडविले आहे. तर त्यांच्या हिंदू-तुर्क संवादासारख्या भारूडातून त्याकाळी इस्लाम धर्माशी घडणारा संघर्ष प्रतीत होतो. 'हिंदुकु तुरक कहे काफर। तो म्हणे विटाळ होईल परता सर। दोन्हींशी लागली करकर। विवाद थोर मांडला ।।' (हिंदु-तुर्क संवाद) परंतु येथे नाथांची भूमिका समन्वयाची असून दोन्ही धर्म परमार्थाकडेच नेणारे असल्यामुळे धर्माच्या नावावरून विवाद करणे व्यर्थ असल्याचे नाथांनी पटवून दिले आहे. परमार्थाच्या मार्गात जातीपातीचे, श्रेष्ठ-कनिष्ठतेचे सगळे भेद निरर्थक, अज्ञानमूलक असल्याची नाथांची भूमिका यातून अत्यंत परखडपणे व्यक्त झालेली आहे.

नाथांच्या 'जोहार' या भारूडात ब्राह्मण आणि महार यांचा संवाद लक्षवेधक ठरलेला आहे. अहंकाराने ग्रासलेला ब्राह्मण हे विश्व निर्गुण परमात्म्यापासून निर्माण झाले या अर्थी आपले आईबाप एकच आहेत. हे महाराचे बोधप्रद विधान ऐकून शांत होतो. या भारुडातून नाथांचा स्पवक्तेपणा आणि तत्कालीन परिस्थितीत त्यांची आपल्या विचारावरील निष्ठा व्यक्त करण्यातील सडेतोडपणा सहजच लक्षात येतो. कमीत कमी शब्दात प्रापंचिक जनांना प्रबोधन करण्याची तळमळ नाथांच्या प्रत्येक भारूडामागे दडलेली आहे. नाथांचे 'वासुदेव' हे भारूड देखील आदर्श भक्ताचे आचरण कसे असावे हे दर्शविणारे आहे. नाथांचा वासुदेव म्हणतो "सांडोनी सर्व चिंता संतपदी लक्ष लागो। मुक्त मी सर्वसंगी सर्वदा वृत्ति जागो। भाविक प्रेमळांच्या संगती चित्त लागो।।" संत सज्जनांच्या चरणी आपले लक्ष केंद्रीत होऊन प्रेमळ भक्ताचा सहवास लाभावा अशी कामना हा वासुदेव करतो. यातून सत्संगतीचे महत्त्वच नाथांनी पटवून दिले आहे.

नाथांचे समाजनिरीक्षण जेवढे सूक्ष्म होते तेवढीच त्यांची सहानुभूती व्यापक होती. अत्यंत दुराचारी लोकही जर पश्चात्ताप होऊन भक्तिमार्गाला लागले तर त्यांचा उद्धार होतो हा भक्तिमार्गाचा सिद्धांत त्यांनी लोकमनात रुजविण्याचा प्रयत्न केला. अविचारामुळे संसारात खऱ्या शाश्वत सुखाची प्राप्ती होणे शक्य नाही याची जाणीव दादला या भारूडातून करून देताना 'मोडकेसे घर तुटकेसे छप्पर।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

देवाला देवघर नाही ।। मला दादला नलगे बाई ।।' असे सांगून 'एका जनार्दनी समरस झाले। तो रस येथे नाही ।। घराचे रूपक साधून देहाची नश्वरता येथे
नाथांनी पटवून दिली आहे. या भारूडात सद्‌बुद्धीरूपी नारी आपल्या फाटक्या, नश्वर संसाराची व्यथा आपल्या सखीला सांगते आहे आणि शेवटी भगवंतालाच पती मानून त्याच्याशी तादात्म्य पावते.

याचप्रमाणे नाथांचे थट्टा' हे भारूड बाह्यता रंजनप्रधान असले तरी वस्तुतः विषयासक्त माणसाच्या डोळ्यात अंजन घालणारे प्रबोधनप्रधान आहे अशी ही थट्टा। भल्याभल्यासि लाविला बट्टा ।। ब्रह्मदेव त्रैलोक्याला शोधी। बहेने हारविली बुद्धी। मोठमोठ्या देवांचीही विषयासक्तीमुळे कशी फजिती झाली हा विचार येथे सूचित करून शेवटी थट्टेने मेला दुर्योधन। भस्मासुर गेला भस्म होऊन। वालीही मुकला आपुला प्राण। अशी ही थट्टा।।" असे सांगून या बट्टेपासून म्हणजेच विषयासक्तीपासून मनुष्याने दूर रहावे याची जाणीव नाथ करून देतात.

नाथांच्या 'भटीण' या भारूडातील भटीण' म्हणजे कुबुद्धी आणि 'भट' म्हणजे जीव आहे. विवेकाने सावध झालेल्या भटाच्या म्हणजे जीवाच्या लक्षात येते की या कुबुद्धीमुळे आपण मोहात अडकलो होतो. तेव्हा तो कुबुद्धीरूपी भटीणीला उपदेश करतो. त्यामुळे तिथी चंचलता न होऊन ती सद्‌गुरूला शरण जाते. नाथांचा आंधळा हा पारमार्थिक अंधत्व आलेला आंधळा असून सद्‌गुरूकृपेने आत्मस्वरूप पाहण्याची दिव्यदृष्टी त्याला लाभली आहे. त्यांचा 'बहिरा' इंद्रियसुखाच्या मागे लागल्यामुळे आपण भगवंताचे नाव ऐकले नाही अशी खंत व्यक्त करतो. तर 'संन्यासी' या भारूडातून नाथांनी दांभिक संन्यासावर कोरडे ओढले आहे. नाथांची 'सौरी' सहा दादुले कैले परि म्यां ऐसा नाही देखिला दादुला।' असे सांगून जे समाधान सहा दुदुल्याकडून म्हणजेच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. कडून मिळू शकले नाही ती तृप्तता एका परमेश्वराने बहाल केल्याचे सांगते. कुत्रे या भारूडातूनही नाथांनी अहंकारी लोकांची चांगलीच कानउघडणी केली आहे.

सामाजिक प्रबोधनाच्या ट्रीने एकनाथांच्या भारूडांचे स्वतःचे असे एक असाधारण स्थान आहे. विविध वैशिष्ट्यांनी, वैविध्यांनी आणि अंगभूत गुणांनी नाथांची ही भारूडे नटलेली आहेत. नाथांनी या भारूडांच्या माध्यमातून लोकरंजन करता करता जसे धर्मजागरण केले त्याचप्रमाणे पारमार्थिक व मानवी मनाला उद्बोधन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. समाजातील दुर्गुण, दुपणा, दंभ, ढोंग, विषमता, स्वार्थ, द्वेष, मत्सर इत्यादी दोषांवर कठोर टिका करून मानवी समता आणि सद्भाव या सामाजिक सद्‌गुणांचा पुरस्कार केला. त्याट्रीने संत एकनाथ हे खऱ्या अर्थाने 'लोकनाथ' ठरतात. भारूडाच्या माध्यमातून त्यांनी जे लोकशिक्षणाचे कार्य केले ते आजही अतुलनीय आणि मार्गदर्शक ठरणारे आहे. नाथांनी समाजातील नानाविध घटकांचे त्यांच्यातील वृत्ती-प्रवृत्तीचे दर्शन घडवून त्यांच्यात मूल्य रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी पार पाडलेली लोकशिक्षकाची भूमिका आजही समाजसुधारणा करणाऱ्यांना बोधप्रद ठरावी अशीच आहे.

**संत एकनाथांचे जीवन आणि अध्यात्मिक दृष्टिकोन**

संत एकनाथ हे १६व्या शतकातील महाराष्ट्रातील थोर संत, कवी आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म पैठण (जि. औरंगाबाद) येथे इ.स. १५३३ सुमारास झाला. ते वऱ्हाडातील एक प्रतिष्ठित देशस्थ ब्राह्मण कुटुंबात जन्मले. त्यांचे गुरु स्वामी जनार्दन होते, जे स्वयं अद्वैत वेदान्ती होते. त्यांनी एकनाथांना केवळ शास्त्रज्ञानच नव्हे, तर भगवद्भक्ती व समाजसेवेची प्रेरणाही दिली.

एकनाथांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण भक्तिमार्गात घालवला. त्यांनी 'एकनाथी भागवत', 'भागवत रामायण', 'रुक्मिणीस्वयंवर', 'भावार्थ रामायण' आणि अनेक अभंग, भारुडे, ओव्या रचून समाजाला अध्यात्माचा मार्ग दाखविला. त्यांनी अत्यंत सुलभ आणि लोकभाषेतून साहित्य निर्मिती करून सामान्य जनतेला धर्ममार्ग समजावला.

**अध्यात्मिक दृष्टिकोन:**

**1. सर्वसमावेशक भक्ती:**

संत एकनाथांनी जातीपातीच्या भिंती मोडून टाकल्या. त्यांनी नीच समजल्या जाणाऱ्या जातीतील लोकांसोबत संवाद साधला, जे त्या काळात समाजाला आव्हान देणारे होते. त्यांच्या लेखनातून 'विठोबा' हा सर्वांचा देव असल्याची शिकवण स्पष्ट दिसते.

**2. नामस्मरणाचे महत्त्व:**

एकनाथांनी "रामकृष्णहरी" या त्रिसंध्येच्या नामजपाचा आग्रह धरला. त्यांना वाटत होते की ईश्वर प्राप्तीसाठी नामस्मरण, नितांत श्रद्धा आणि सत्कर्म पुरेसे आहेत.

**3. कर्मयोग आणि गृहस्थधर्म:**

ते म्हणत असत की संन्यासाशिवायही अध्यात्म प्राप्त होऊ शकते. त्यांनी स्वतः गृहस्थाश्रमात राहून भक्तिमार्ग आचरला. 'संत गाभाऱ्यात नाही, तर व्यवहारात असतो' हे त्यांनी आपल्या आचरणातून दाखवून दिले.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(A)| February - 2026

**4. सहिष्णुता आणि क्षमाशीलता:**

एकनाथ हे अत्यंत क्षमाशील आणि सहिष्णु होते. त्यांनी अत्याचार सहन केले तरी प्रतिशोध घेतला नाही. त्यांच्या प्रसंगातून क्षमाशीलतेची शिकवण मिळते.

**5. समाजप्रबोधन:**

ते फक्त अध्यात्मिकच नव्हे तर सामाजिक सुधारणांचेही समर्थक होते. त्यांनी भारुडांतून समाजातील व्यसन, अंधश्रद्धा आणि विषमता यांचा समाचार घेतला.

संत एकनाथांचे जीवन हे भक्ती, समता, सहिष्णुता आणि ज्ञानाचा संगम होते. त्यांनी आपल्या साहित्य व कृतीमधून अध्यात्माचे लोकशिक्षण केले. त्यांचा अध्यात्मिक दृष्टिकोन हा व्यवहाराशी जोडलेला, सर्वसमावेशक आणि मानवतावादी होता. म्हणूनच ते आजही महाराष्ट्राच्या सामाजिक व अध्यात्मिक जीवनात दीपस्तंभासारखे आहेत.

संत एकनाथांचा जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. त्यांचे घराणे धर्मनिष्ठ आणि विद्वान होते. लहानपणीच आई-वडिलांचे निधन झाल्यानंतर आजोबा-आजींनी त्यांचे संगोपन केले. त्यांच्या जीवनात भक्ती, नामस्मरण आणि शास्त्राध्ययन यांचा गहिरा प्रभाव होता. जनार्दन स्वामी हे त्यांचे गुरू असून, त्यांनी एकनाथांना ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि भागवत यांचा अभ्यास घडवून आणला.

प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय साधणे ही त्यांच्या जीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यामुळेच त्यांना 'शांतिब्रह्म' असेही म्हटले जाते. डॉ. यु. म. पठाण यांच्या मते, "नाथांनी लोकरंजन करता करता धर्मजागरण आणि पारमार्थिक उन्नती घडविली."

**समाजदर्शन आणि भारूडातील प्रबोधन**

'भारूड' या लोककाव्य प्रकाराद्वारे एकनाथांनी समाजातील दोष, अंधश्रद्धा, दांभिकता आणि विषमता यावर प्रखर प्रकाश टाकला. 'विंचू' या भारूडात त्यांनी षड्रिपूंपासून (काम, क्रोध इ.) मुक्त होण्याचा संदेश दिला. कामक्रोधरूपी विंचवाला उतरवण्यासाठी सत्वगुणांची आवश्यकता आहे हे त्यांनी सांगितले.

भारूडांतून त्यांनी वासुदेव, पिंगळा, डोंबारी, पोपट, आंधळा, भटीण, सौरी यांसारख्या लोकपात्रांचा वापर करून विविध समाजघटकांपर्यंत अध्यात्म पोचवले. 'जोहार' या भारूडात ब्राह्मण आणि महार यांच्यातील संवादातून त्यांनी जातिभेद नाकारला.

'हिंदू-तुर्क संवाद' या भारूडात दोन धर्मांतील संघर्षाचा निषेध करून त्यांनी धार्मिक समन्वयाची भूमिका घेतली. त्यांच्या मते, सर्व धर्म परमार्थाकडे नेणारे आहेत.

**नाथांचे लोकसाहित्य आणि समता-दृष्टी**

एकनाथांनी समाजातील विविध घटकांचे दर्शन आपल्या भारूडात घडवले. त्यात भुत्या, वाघ्या, माळी, डोंबारी, कोल्हाटी, चोपदार इ. व्यक्तिरेखांमधून समाजाच्या तळागाळातील जीवन मांडले आहे. त्यांनी 'दादला', 'थट्टा', 'भटीण', 'सौरी', 'कुत्रे' अशा भारूडांमधून मानवी दुर्बलता, अहंकार, विषयासक्ती इ. दोषांवर भाष्य केले आहे.

'वासुदेव' या भारूडात सत्संगतीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यात भक्ती, साधना, आणि भगवंताशी तादात्म्य साधण्याचा संदेश आहे. त्यांच्या भारूडांमध्ये केवळ धार्मिक उपदेश नाही तर समाजातील दुर्गुणांवर स्पष्ट, ठाम आणि कलात्मक टीका आहे.

**निष्कर्ष**

संत एकनाथांचे साहित्य म्हणजे भक्ती आणि समाजदर्शन यांचा अद्वितीय संगम आहे. त्यांनी भारूड या लोकप्रिय माध्यमातून सामान्य जनतेला आध्यात्मिक जागृती आणि नैतिक मूल्यांचे बिंबन घडवले. जातीभेद, अंधश्रद्धा, दांभिकता यांचा निषेध करत त्यांनी समतेचा प्रचार केला. त्यांच्या साहित्यामुळे ते खऱ्या अर्थाने 'लोकनाथ' ठरतात.

**संदर्भ**

1. संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा (संपा.) डॉ. कल्याण काळे, रा. शं. नगरकर स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 1992, पृ. 16
2. महाग्रातील पंथ सुहास आगरकर डायमंड पब्लिकेशन पुणे, 2009, पृ. 76
3. संतकाव्य संचित डॉ. उषा देशमुख माया प्रकाशन, नागपूर 2000 पृ. 138
4. एकनाथ वाङ्मयदर्शन (संपा.) भगवंत महाग्राचा भागवत धर्म संत एकनाथ देशमुख साहित्य अकादेमी, दिल्ली 2003. पृ. 17 डॉ. शं. दा. पेंडसे कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे 1971, पृ. 77
5. वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य पृ 215 (संपा.) डॉ. शिवाजीराव मोहिते कर्मवीर प्रकाशन, पुणे 2008.
6. संत एकनाथ दर्शन (संपा.) डॉ. हे. वि. इनामदार कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1983, पृ. 115